


# ठाणे ते सीएसएमटी 'लोकल वारी'त सायबर जनजागृतीचे विशेष अभियान

मुंबई (स. गांवकरी) : आषाढी एकादशीच्या पवित्र दिनी भक्तिमय वातावरणात सामाजिक भान जागवणाऱ्या एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बा.णा. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) या 'लोकल वारी'मध्ये सायबर जनजागृती मोहिम राबवण्यात आली. या उपक्रमाचे नेतृत्व QHF BNB अध्यक्षा श्रुती सुनील शिरसाट यांनी केले. त्यांच्या सायबर वॉरियर्स टीमने रेल्वे प्रवासादरम्यान वारकऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत थेट संवाद साधला. सायबर गुन्हेगारी वाढत असलेल्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव, सुरक्षित व्यवहार कसे करावेत, तसेच सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक १९३० याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर, घोषवाक्ये आणि संवाद वारकऱ्यांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरले. सहज-सोप्या भाषेत दिलेल्या मार्गदर्शनामुळे अनेक प्रवासी मंत्रमुग्ध झाले. या कार्याबद्दल QHF BNB अध्यक्षा श्रुती शिरसाट यांचा वारकऱ्यांकडून विशेष सत्कार करण्यात आला. तसेच या सामाजिक उपक्रमात पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र शिवरामवार, पोउपनि श्री. केंगार, श्री. शहारे आणि श्री. सांगळे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. सायबर सुरक्षिततेबाबत समाजात जागृती निर्माण करत, भक्ती व सेवेची संगती साधणारी ही लोकल वारी एक प्रेरणादायी पाऊल ठरली आहे.